# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १४९ / २०२४

नवीन कृषी वीज जोडणी व नुकसान भरपाई मिळण्याबाबत

श्री. शिवाजी रामचंद्र पवार ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादीत इस्लामपूर (महावितरण) ........................................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- शिवाजी शामराव मोरे

प्रतिवादीतर्फे :- चंद्रकांत दामसे, कार्यकारी अभियंता, इस्लामपूर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ४ फेब्रुवारी २०२५

आदेश पारित दिनांक :- १२ मार्च २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण कोल्हापूर परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक १३ ऑगष्ट २०२४ रोजीच्या आदेशाविरूध्द सदरचे अभिवेदन दिनांक २१ नोव्हेंबर २०२४ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक १३ ऑगष्ट २०२४ आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

*"१) तक्रारदार यांच्या दिनांक १६.०२.२०१६ रोजीच्या मागणी प्रमाणे शेती पंप वीज जोडणी वि.प. विद्यत कंपनीने तक्रारदार ग्राहकास त्यांच्या मुळ मागणी अर्जानुसार या आदेशाच्या तारखेपासून लवकरात लवकर परंतू कोणत्याही परिस्थितीत हा आदेश पारित झालेपासून ३ महिन्यांच्या आत अगर त्यापूर्वी शेती पंप वीज जोडणी द्यावी व वीज पुरवठा चालू करावा, असा वि.प. विद्युत वितरण कंपनीस आदेश देण्यात येत आहे.*

*२) तक्रारदार ग्राहकास वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबाबत वि.प.विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकास विनियमातील जोडपत्र-२ नुसार सर्व्हीस कनेक्शन चार्जेसच्या दुप्पट इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.*

*३) तक्रारदार ग्राहकांच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत"*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या झालेल्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी श्री. शिवाजी रामचंद्र पवार (जेष्ठ नागरीक) यांनी मौजे रेठरेहरणाक्ष, तालूका वाळवा, जिल्हा सांगली, (ग्राहक क्र.२८४६२००४२६७४) गट क्र.१७१० मध्ये नवीन ७.५ एचपी कृषीपंपासाठी दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी महावितरण कार्यालयाकडे अर्ज दाखल केला. त्यानंतर महावितरणने नवीन वीज जोडणीच्या जागेची स्थळ तपासणी करून लघुदाब वाहिनीचे काम पुर्ण केले व नंतर अतिरीक्त लघुदाब वाहिनीचे अंदाजपत्रक मंजूर करून दिनांक १५ एप्रिल २०१६ रोजी रू.८१५०/- चे कोटेशन दिले. सदर कोटेशनच्या रक्कमेचा भरणा अपिलार्थीने दिनांक २६ एप्रिल २०१६ रोजी केला. नवीन कनेक्शन बाबतच्या औपचारीकता पूर्ण करून सुध्दा अपिलार्थीस वीज जोडणी देण्यात आली नाही.
- त्यानंतर महावितरणने अपिलार्थीस वीज जोडणीसाठीचा अर्ज पुन्हा भरण्यास सांगितला. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक २३ ऑगष्ट २०२२ रोजी (ग्राहक क्र.२८४६२०७४०२०७) नवीन ७.५ एचपी कृषीपंपासाठी महावितरण कार्यालयाकडे अर्ज दाखल केला. सदर अर्जाचे मंजूर अंदाजपत्रकाचे रू.७८००/- रक्कमेचा भरणा अपिलार्थीने दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजी केला. परंतू सदर दोन्ही अर्जांपैकी एकाही अर्जानुसार अपिलार्थीस वीज जोडणी मिळाली नाही.
- अपिलार्थीने महावितरणच्या मासिक उर्जा बैठकीत अनेक वर्ष पाठपुरावा करून सुध्दा वीज जोडणी देण्यात आलेली नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- म्हणून अपिलार्थीने लवकरात लवकर वीज पुरवठा मिळावा व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विद्युत पुरवठा संहीता, (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम २०२१ (परवानाधारकांच्या कृतीची मानके, आणि पॉवर क्वॉलिटी विनियम २०२१) नुसार प्रतीवर्ष रु.१०,०००/- ची नुकसान भरपाई मिळावी म्हणून दिनांक १ जुलै २०२४ रोजी मंचाकडे गाऱ्हाणे दाखल केले.
- मंचाने दिनांक १३ ऑगष्ट २०२४ आदेशान्वये आदेशाच्या तारखेपासून ३ महिन्याच्या आत वीज जोडणी देण्याचे व वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबाबत वि.प.विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकास विनियमातील जोडपत्र-२ नुसार सर्व्हीस कनेक्शन चार्जेसच्या दुप्पट इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी असे निर्देश दिले. तथापि, मंचाच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस वीज जोडणी देण्यात आली नाही.
- अपिलार्थीचे दिनांक २१ नोव्हेंबर २०२४ रोजी सादर केलेले अभिवेदन दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी मा. विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे अभिवेदन दाखल करून घेतले. नवीन कृषीपंप वीज जोडणी मिळावी व वीजे अभावी शेतीचे नुकसान होत, म्हणून परवानाधारकांच्या कृतीची मानके, आणि पॉवर क्वॉलिटी विनियम २०२१ नुसार रु.८०,०००/- ची नुकसान भरपाईची मागणी अभिवेदनात केली आहे.

३. प्रतिवादी महावितरणने दिनांक १३ जानेवारी २०२५ च्या उत्तरातोल व दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या ई-सुनावणीतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

- अपिलार्थी श्री. शिवाजी रामचंद्र पवार (जेष्ठ नागरिक) यांनी मौजे रेठरेहरणाक्ष, तालूका वाळवा, जिल्हा सांगली, (ग्राहक क्र.२८४६२००४२६७४) नवीन ७.५ एचपी कृषीपंपासाठी दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी महावितरण कार्यालयाकडे अर्ज दाखल केला. अपिलार्थीस ३ फेज शेतीपंप वीज जोडणी देण्यासाठी एजी फिडरवरील रोहीत्रावरून १२ पोल लघुदाब वीज वाहिनी उभारणी करून वीज जोडणी देण्याचे नियोजित होते. त्यानुसार SPA (एसपीए) या योजने अंर्तगत वीज जोडणी देण्याचे अंदाजपत्रक देण्यात आले. त्यानुसार पायाभूत आराखडा व त्यासाठी आवश्यक असणारा निधी मंजूरही करण्यात आला. मात्र, सदर वीज वाहिनी उभारणीचे काम कंपनीच्या विद्युत ठेकेदाराकडून करण्याचे चालू असताना, स्थानिक ग्रामस्थांकडून अडथळा निर्माण करण्यात आला. सदर अडथळयाचे निराकरण करण्यासाठी अपिलार्थींना वेळोवेळी विनंती करूनही त्यांच्याकडून कोणतेही सहकार्य प्राप्त झाले नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- सदर बाबत स्थानिंकाकडून येणाऱ्या अडचणीचे निराकरण करणेकामी महावितरणकडून सतत प्रयत्न करूनही अडथळा न मिटल्याने कनेक्शन देण्यासाठी आवश्यक असलेले पोल उभारणीचे काम करता आले नाही. सदर अडचणो बाबत बऱ्याच कालावधीत तोडगा न निघाल्याने बराच काळ सदर अडचण रेंगाळून राहील्याने अपिलार्थीस वीज जोडणी देणे शक्य झाले नाही.
- दरम्यानच्या कालावधीत SPA (एसपीए) योजना महावितरणकडून बंद करण्यात आली. तसेच स्थानिकांच्या अडथळयामुळे सदर कामास अतिरीक्त विलंब झाला. विहीत कालावधीत काम पर्ण न झाल्यामुळे, पायाभूत आराखडयासाठी मंजूर झालेला निधीही गोठला गेला व नंतर सदर योजनाही बंद झाली. त्यानंतर शासनाच्या शेतीपंप ग्राहकास (एचव्हीडीएस) या योजनेअंर्तगत सर्व्हे करुन अपिलार्थींना वीज कनेक्शन देणेकामी कंपनी ठेकेदाराकडून पायाभूत सुविधा उभारणीचा पुनच्शः सर्व्हे केला गेला. परंतू सदर कामातही स्थानिक ग्रामस्थांचा वाहिनीच्या कामामध्ये अडथळा निर्माण करण्यात आला. प्रतिवादीने सदर अडचण मिटविण्यासाठी प्रयत्न करूनही योग्य प्रमाणात अपेक्षीत यश आले नाही. सदर अडथळा मिटविण्यासाठी अपिलार्थीसि दिनांक २५ सप्टेंबर २०२०, ७ डिसेंबर २०२० व ७ डिसेंबर २०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात येऊनही त्यांच्याकडून कोणतेही वैयक्तिक सहकार्य प्राप्त झाले नाही. परीणामी, अपिलार्थीसि वीज जोडणी देणे शक्य झाले नाही. सदर पत्राच्या प्रती ग्रामपंचायत रेठरेहरणाक्ष यांचेकडे देखील देण्यात आल्या होत्या जेणेकरून या प्रकरणी योग्य तो निवाडा होऊन वीज जोडणी देण्याची प्रक्रिया पर्ण होईल; परंतू वीज जोडणी अजुनही प्रलंबित आहे.
- सर्वेक्षण करून वीज जोडणी इतर ठिकांणावरून मिळण्याची शक्यता आहे का? याबाबत अपिलार्थीने प्रतिवादीस दिनांक २३ ऑगष्ट २०२२ रोजी पुनश्चः अर्ज सादर केला. त्यानुसार महावितरणकडून तातडीने अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले व महावितरणचे अधिकृत ठेकेदार यांना काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात आले. परंतू ठेकेदारांच्या दिनांक १० जुलै २०२३ च्या पत्रान्वये व प्रत्यक्ष पाहणी करता, सदर कामात स्थानिकांचा विरोध कायम राहील्यामुळे पायाभूत आराखडा उभारणीचे काम होऊ शकले नाही. दिनांक २१ जून २०२३ रोजीच्या ग्रामपंचायत रेठरेहरणाक्ष यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस वीज जोडणी कामास अडथळा असल्याचे मान्य करून, सदर काम मोजणीसाठी प्रलंबित ठेवून मोजणी पर्ण झाल्यावर पोल उभे करण्याचे कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले होते. या कालावधीतही स्थानिकांकडून होत असलेल्या विरोधामुळे अपिलार्थीस वीज जोडणी देता आली नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

- मंचाच्या आदेशानुसार महावितरणकडून वीज जोडणीसाठी सर्व यत्रंणा कार्यान्वीत करणेसाठी संबधीत ठेकेदार गेले असता सदर ठिकाणी स्थानिकांकडून पुनश्चः अडथळा निर्माण करण्यात आला. त्यामुळे महावितरणने दिनांक ३ जून २०२४ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रांत अधिकारी यांनाही सदर प्रकरणावर सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय देण्याबाबतची विनंती केली व सदर विंनती मा. प्रांत अधिकारी यांनोही मान्य केली असून लवकरात लवकर याबाबत सुनावणी घेण्याबाबतचे तोंडी आश्वासन दिले आहे.
- अपिलार्थीने वीज कनेक्शनची मागणी केलेल्या क्षेत्रात शेतीच्या पाणी पुरवठयासाठी नदीपासून पाईप लाईनद्वारे सदर शेतीक्षेत्रात पाणी पुरवठा केला जात आहे. सदर भागात पावसाळयात जमा झालेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करण्यासाठी विहिर काढली जाते व ते पाणी उपसा करण्यासाठी अपिलार्थीस वीज कनेक्शनची आवश्यकता आहे; त्यासाठी अपिलार्थी नविन वीज कनेक्शनची मागणी करत आहेत.
- अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अनुसरून केलेल्या पाहणीवरून अपिलार्थीच्या जागेवरून वीज पुरवठा करणेकामी असलेल्या रोहीत्र ११ केव्ही रेठरहरणाक्ष गावठाण या उच्चदाब वाहिनीवरून भारीत असल्यामुळे त्यावरून कृषीपंप वीज जोडणी देता येत नव्हती; त्यासाठी उच्चदाब प्रणाली (एचव्हीडीएस) या योजनेअंर्तगत अथवा इतर पर्यायी मार्गाने वीज जोडणी देणेसाठी प्रयत्न करण्यात आले होते. तसेच, स्थानिकांचा विरोधाचे निराकरण करून अपिलार्थीस वीज जोडणी देण्याचे प्रयत्न अद्यापही महावितरणकडून चालू आहेत.

**विश्लेषण व निर्णय**

५. अपिलार्थी श्री. शिवाजी रामचंद्र पवार (जेष्ठ नागरिक) यांनी नवीन ७.५ एचपी कृषीपंपासाठी (ग्राहक क्र.२८४६२००४२६७४) दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी महावितरण कार्यालयाकडे अर्ज दाखल केला. त्यानंतर महावितरणने नवीन वीज जोडणीच्या जागेची स्थळ तपासणी करून दिनांक १५ एप्रिल २०१६ रोजी कोटेशन दिले. सदर कोटेशनच्या रक्कमेचा भरणा अपिलार्थीने दिनांक २६ एप्रिल २०१६ रोजी केल्यानंतरही अपिलार्थीस वीज जोडणी देण्यात आली नाही. त्यानंतर महावितरणच्या विनंतीनुसार अपिलार्थीने दिनांक २३ ऑगष्ट २०२२ रोजी (ग्राहक क्र.२८४६२०७४०२०७) नवीन ७.५ एचपी कृषीपंपासाठी महावितरण कार्यालयाकडे नव्याने अर्ज दाखल केला. सदर अर्जाचे मंजूर अंदाजपत्रकाचे रक्कमेचा भरणा अपिलार्थीने दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजी केला. परंतू सदर दोन्ही अर्जापैकी एकाही अर्जावर अपिलार्थीस वीज जोडणी मिळाली नाही. अपिलार्थीने महावितरणच्या मासिक उर्जा बैठकीत अनेक वर्ष

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

पाठपुरावा करून सुध्दा वीज जोडणी देण्यात आलेली नाही. वीज जोडणी लवकर मिळण्यासाठी व कृतीमानके नुसार 'नुकसान भरपाई' मिळावी म्हणून मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने आदेशाच्या तारखेपासून ३ महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात यावी व सर्व्हिस चार्जेसच्या दुप्पट इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी असा आदेश दिला. अपिलार्थीचे मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून लवकरात लवकर वीज जोडणी मिळावी व रु.८०,०००/- ची नुकसान भरपाई मिळावी म्हणून मा. विद्युत लोकपाल मुंबई कार्यालयात अभिवेदन दाखल केले.

६. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थी श्री. शिवाजी रामचंद्र पवार (जेष्ठ नागरीक) यांनी ७.५ एचपी कृषीपंपासाठी दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी महावितरण कार्यालयाकडे अर्ज दाखल केला. अपिलार्थीस ३ फेज कृषीपंप वीज जोडणी देण्यासाठी एजी फिडरवरील रोहीत्रावरून १२ पोल लघुदाब वीज वाहिनी उभारणी करून वीज जोडणी देण्याचे नियोजित होते. त्यानुसार SPA (एसपीए) या योजने अंतर्गत वीज जोडणी देण्याचे अंदाजपत्रक देण्यात आले. त्यासाठी आवश्यक असणारा निधी मंजूरही करण्यात आला. सदर वीज वाहिनी उभारणीचे काम कंपनी ठेकेदाराकडून करण्याचे चालू असताना स्थानिक ग्रामस्थांकडून अडथळा निर्माण करण्यात आला. अपिलार्थीस सदर अडथळयाचे निराकरण करण्यासाठी वेळोवेळी विनंती करूनही त्यांच्याकडून कोणतेही सहकार्य प्राप्त झाले नाही. तसेच, सदर अडचणीचे निराकरण करणेकामी महावितरणकडे इतर कोणताही पर्याय नसल्याने पोल उभारणीचे काम करता आले नाही. परिणामी अपिलार्थीस वीज जोडणी देणे शक्य झाले नाही. अपिलार्थीने इतर ठिकांणावरून सर्वेक्षण करून वीज जोडणी मिळणेबाबत दिनांक २३ ऑगष्ट २०२२ रोजी पुनश्चः अर्ज सादर केला. परंतू सदर कामात स्थानिकांचा विरोध कायम राहील्यामुळे पायाभूत आराखडा उभारणीचे काम होऊ शकले नाही. मंचाच्या आदेशानुसार महावितरणकडून वीज जोडणीसाठी संबधीत ठेकेदार गेले असता सदर ठिकाणी स्थानिकांकडून पुनश्चः हरकती घेऊन अडथळा निर्माण करण्यात आला. महावितरणने दिनांक ३ जून २०२४ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रांत अधिकारी यांनाही सदर प्रकरणावर सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय देण्याबाबतची विनंती केली व सदर विंनती मा. प्रांत अधिकारी यांनाही मान्य केली आहे व लवकरात लवकर याबाबत सुनावणी घेण्याबाबतचे तोंडी आश्वासन दिले आहे. प्रांत अधिकाऱ्यांचा निणय मिळाल्यानंतर याबाबत वीज जोडणी देण्याबाबतचा निर्णय घेतला जाईल. मंचानेही याबाबत योग्य ते निरीक्षण करून निर्णय दिला आहे, तो खालील प्रमाणे.

*"तक्रारदार ग्राहकांच्या नवीन विद्युत कनेक्शनच्या कामाच्या वेळी शेजारील शेतकऱ्यांनी व ग्रामस्थानी जेव्हा विरोध व अडथळा केला. त्यावेळी वि.प. विद्युत वितरण कंपनीने विद्युत कायदा २००३ मधील कलम ६७ व ६८ अन्वये व Maharashtra Electricity Work of Licensee Rules, 2012 मधील*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

*नियम ३ नुसार जिल्हाधिकारी सांगली अगर महाराष्ट्र शासनाच्या इतर प्राधिकृत अधिकाऱ्याकडे अर्ज सादर करून शेजारील शेतकऱ्यांचा / ग्रामस्थांचा / सरपंचाचा अडथळा दुर करून तक्रारदार ग्राहकांस वीज जोडणी देण्याची आवश्यकता होती. परंतु, वि.प. विद्युत वितरण कंपनीने वर नमुद केलेल्या नियमानुसार तक्रारदार ग्राहकांच्या नवीन वीज जोडणीबाबत शेजारी शेतकऱ्यांनी केलेल्या अडथळा दूर करणेचा प्रयन्त केला नाही. त्यामुळे तक्रारदार ग्राहकाला वीज कनेक्शन मिळणेस ८ वर्षाचा पदिर्घ कालावधी लागत आहे. त्यामुळे सदर ग्राहकाच्या शेतीचे नुकसान होत आहे. सबब मंच या निष्कर्षास आला आहे की, ग्रामस्थांनी घेतलेली हरकत अगर अडथळा वि.प. विद्युत वितरण कंपनीने जिल्हा अधिकारी सांगली अगर उपविभागीय अधिकारी इस्लामपूर यांच्या मार्फत दूर करून तक्रारदार ग्राहकांस हा आदेश प्राप्त झालेपासून ३ महिन्याच्या आंत विद्युत जोडणी द्यावी."*

७. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२० या विनियमात अप्रत्यक्ष नुकसान भरून देण्याची कोणतीही तरतूद नाही. या संदर्भात विनियम क्र.२०.४ (इ) ची तरतूद लक्षात घेणे गरजेचे आहे.

*"२०.४ (इ) ग्राहकाने सहन केलेल्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीकरीता तो (विद्युत लोकपाल) निवाडा देईल ती रक्कम भरपाई म्हणून तक्रारदाराला अदा करण्याचा निर्देश; आणि / किंवा*

*परंतू तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष, परिणामस्वरूप, आनुषंगिक, दंडात्मक किवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही;"*

८. सदर अभिवेनाबाबत आवश्यक त्या सर्व बाबींचा उहापोह करून मंचाने, योग्य तो निर्णय दिला आहे. तथापि, मंचाच्या आदेशात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे. प्रतिवादीस असे आदेशीत करण्यात येत आहे की.

- अपिलार्थीनी २०१६ मध्ये किंवा त्यानंतर भरणा केलेली व त्यापैकी अपिलार्थीस परत देय असलेली रक्कम रिझर्व्ह बँक (RBI) च्या लागू असणाऱ्या व्याजदराप्रमाणे व्याजा सहोत परत करण्यात यावी.
- अपिलार्थीने देय रक्कम परत मिळावी याकरीता के.व्हाय.सी. (KYC) व अर्जाची परीपुर्तता करावी.
- प्रात कार्यालय, इस्लामपूर यांना सदर प्रकरणी सुनावणी बाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- प्रतिवादीने आदेशाची पर्तता केल्याबाबतचा 'अनुपालन अहवाल' या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करावा.
- अपिलार्थीच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai